विवेक मेहेत्रे

# आता संपले की




साहित्य प्रतिष्ठान

# आता संपले की बारा

विवेक मेहेत्रे

ई साहित्य प्रतिष्ठान

पुस्तकाचे नांव: आता संपले की बारा

प्रकार : हास्यचित्रे

व्यंगचित्रकार : विवेक मेहेत्रे

9821739327

mehetre@gmail.com

ई पुस्तक : अमृता ढगे,

Last Bench Designs

esahity@gmail.com
www.esahity.com
www.ednyaneshwari.com
http://etyarth.blogspot.in/
http://esahityapratishthan.blogspot.in/
www.marathiriyasat.com

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

या पुस्तकातील हास्यचित्रांचे सर्व हक्क श्री विवेक मेहेत्रे यांचेकडे सुरक्षित असून त्यांचा कोणत्याही प्रकारे वापर करण्यापुर्वी त्यांची परवानगी घेणे आवश्यक आहे.

e Sahity Pratishthan®
eleventh floor
eternity, G1102
eastern express highway
Thane. 400604
Ph : 9869674820

©esahity Pratishthan® 2012

98% of the people who get the magazine say they read the cartoons first - and the other 2% are lying.

David Remnick

# श्री. विवेक मेहेत्रे



श्री. विवेके मेहेत्रे यांची ओळख काय करून द्यायची? त्यांची चित्रंच बोलतात. प्रत्येक मराठी माणसाने विवेक मेहेत्रेंची हास्यचित्रं कुठे ना कुठे पाहिलेली असतातच. जवळपास सर्व दिवाळी अंकांतून त्यांची हास्यचित्रं येतात. गेल्या चौतीस वर्षांत त्यांनी सुमारे साठेक हजार चित्रं काढली असतील. त्यांचे हास्यचित्रकारांमध्ये काय स्थान आहे हे समजण्यासाठी एवढे सांगितले तरी पुरेसे आहे की cartoonist combine या संस्थेच्या स्थापनेत त्यांचा बाळासाहेबांबरोबर महत्त्वाचा वाटा होता. खुद्द बाळासाहेबांकडून शाबासकी मिळवणारे विवेकजी यांना आजवर दोनदा शं वा किर्लोस्कर हा मानाचा पुरस्कार मिळाला आहे. नुकताच त्यांचा द मा मिरासदार यांच्या हस्ते रेगे पुरस्कारानेही सन्मान करण्यात आला. BE,ME,MBA करून पैशाच्या मागे न लागता पुर्णवेळ कार्टुनिस्ट म्हणून काम करणाऱ्या विवेक मेहेत्रेंमुळे मराठीला एक आंतरराष्ट्रीय दर्जाच्या व्यंगचित्रकलेची समज आणि विषयाची खोली जाणणाऱ्या चित्रकाराची देणगी मिळाली आहे.

२०१२ हे वर्ष भारतात व्यंगचित्रकरांच्या दृष्टीने सुगीचे वर्ष होते. आजूबाजूला भयंकर लाजिरवाण्या गोष्टी घडत होत्या. या घटनांवर विवेकजींची अत्यंत संयमित, प्रगल्भ आणि तरीही नेमक्या वर्मावर बोट ठेवणारी मार्मिक व्यंगचित्रे अनेक वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाली. विवेकजींच्या हास्यचित्रांचा उद्देश केवळ करमणूक नसून वाचकाला अंतर्मुख करून विचार करायला लावणे हा असतो. त्यामुळे त्यांच्या व्यंगचित्रांतून २०१२ चे सर्व रंग, सर्व घटनांचा एक पटच उलगडतो. त्यांच्या निवडक दिडशे व्यंगचित्रांची मेजवानी ई साहित्य प्रतिष्ठानच्या वाचकांसाठी त्यांनी पाठवली आहे.


कृपया आपल्या प्रतिक्रिया mehetre@gmail.com वर कळवाव्यात.



हास्यविवेक
-विवेक मेहेत्रे
काचेच्या गोळ्यात भविष्य
प्रामाणिक, साक्षर, नेभळट उमेदवारांऐवजी गुंड, निरक्षर पण धाडसी उमेदवार विजयी होण्याचीच जास्त शक्यता आहे!
आयुष्यात प्रथमच आतमधून तुरुंग कसा असतो ते बघायची संधी मिळाली...! आतमध्ये असलेल्या पण निवडणूक लढवणाऱ्या काही जणांचे प्रचार-पोस्टर्ससाठी फोटो काढले!
mehetre2011@gmail.com
' ५ राज्यांमध्ये भ्रष्टाचारी उमेदवारांची डाळ शिजणार नाही ' असं मी वाचलं ...म्हणून हा प्रेशर कुकर सोबत न्या प्रचाराला!!
'टीम अण्णा' ५ राज्यांमध्ये कॉंग्रेसविरोधी प्रचार करतील या अपेक्षेने मी कर्ज काढलं... २० लाख टोप्या 'मैं भी अन्ना' असं छापून विक्रीसाठी रेडी ठेवल्या......



तुला मी तमाशा, मंडई किंवा सर्कस यापैकी एका विषयावर निबंध लिहायला सांगितलं होतं... मग तू 'निवडणूक' विषयावर का लिहिलास?
माझे वडील म्हणाले की त्यात तिन्ही विषय सामावलेले असतात!!
यावेळी आमच्या पक्षातर्फे उभे असलेल्या गुंडांना तुम्ही विजयी कराल तर मी आश्वासन देतो की पुढच्या वेळी आम्ही नक्कीच प्रामाणिक, निःस्वार्थी, सज्जन उमेदवारांची निवड करू !!
लाच
मते द्या!!
हास्यविवेक
-विवेक मेहेत्रे
बाबा रामदेव किंवा अण्णा हजारेंच्या विरोधात एखादं विधान करून प्रसिध्दी मिळण्याची सध्या शक्यता नाही...त्याऐवजी सलमान रश्दी किंवा निवडणूक आयोगावर टीका करून का नाही पाहत?
...मीसुध्दा तेच सांगतोय की तुम्ही 'निर्भयपणे' आम्हाला मत द्या! जर कोणी सज्जन तुम्हाला नैतिकतेचं, चारित्र्याचं प्रामाणिकपणाचं भय दाखवू लागला तर त्याला भीक न घालता आम्हालाच निवडून द्या !!
मते द्या
mehetre2011@gmail.com


हास्यविवेक
-विवेक मेहेत्रे
कोणता मुखवटा लावून संमेलनात वावरणार? 'प्रकाशकांची संख्या वाढतेय म्हणून आनंद व्यक्त करणारा' की 'आजचे तरुण मराठी पुस्तकं विकत घेत नाहीत म्हणून शोक व्यक्त करणारा?
प्रकाशक
'हाऊ टू...' प्रकाराच्या, मार्गदर्शन करणाऱ्या पुस्तकांना सध्या मराठीत चांगले दिवस आहेत म्हणे... ह्यांच्या मदतीने मीसुध्दा 'चोरी-घरफोडीचे तंत्र-मंत्र' नावाचं पुस्तक लिहिलंय...! बोला... छापता का?
mehetre2011@gmail.com
तुमच्या पत्रानुसार आम्ही तुम्हाला 'महिलांच्या साहित्यासाठी' प्रदर्शनात स्वतंत्र स्टॉल दिला आहे... पण तो 'या' साहित्यासाठी नव्हे! तुमचा गैरसमज झालेला दिसतोय!!
प्रदर्शन
तुम्ही कोणतं पुस्तक लिहिलं आहे?
'उंची कशी वाढवावी?' ह्या विषयावर बेस्ट सेलर पुस्तक आहे माझं!


हास्यविवेक
-विवेक मेहेत्रे
ह्यांना अलीकडे रोज ते डॉ. सुब्रम्हण्यम स्वामी स्वप्नांत दिसतात...अन् हे दचकून उठतात!
अत्याधुनिक मोबाईल हॅन्डसेट्स मिळतील
तुमचा काहीतरी गैरसमज होतोय साहेब..! आमच्याकडे फक्त ब्ल्यूटूथवाले हॅन्डसेट्स आहेत... ब्ल्यू फिल्मवाले नाहीयत!!
त्यांच्या संयमाचं आपण कौतुक करायला हवं.. स्वतःच्या मोबाईलफोनमध्ये असंख्य पोर्न व्हीडिओ असूनही त्यांनी विधानसभा सुरू असताना ते स्वतः पाहिले नाहीत किंवा इतर आमदारांनाही दाखवले नाहीत!!
सार्वजनिक अभिनंदन व सत्कार
भ्रष्टाचार, टू·जी·घोटाळा, महागाई, दहशतवाद हे महत्त्वाचे प्रश्न बाजूला ठेवून आपल्याला देशापुढच्या सर्वात गंभीर समस्येकडे लक्ष द्यायला हवं.... क्रिकेटसंघाला 'बेसहारा' केलेल्या 'सहारा'च्या जागी कोण येणार इकडे!
mehetre@gmail.com


हास्यविवेक
-विवेक मेहेत्रे
हा हार राहुलजींकडे पाठवतोय. उत्तरप्रदेशातील पराभवाच्या कारणांचे विश्लेषण आहे या कागदांवर!
काय? कृपाशंकरांच्या बेहिशोबी मालमत्तेविषयी माहिती देणाऱ्या आणखी तक्रारी आल्या आहेत? पण त्या आता ठेवू कुठे?
दैनिक वृत्तमित्र
'आदर्श घोटाळया'तील नव्या नव्या भ्रष्टाचाराच्या बातम्या रोज छापून जागा वाया घालवण्याऐवजी दर आठवड्याला त्याबद्दलची एक वेगळी पुरवणीच छापली तर?
संपादक
त्यांनी पक्षाला काळीमाच फासला! इतकी वर्ष सक्रीय राजकारणात राहूनही त्यांना साध्या बेनामी मालमत्ता कोठे व कशा दडवून ठेवाव्यात हे ठाऊक नसावं.... निदान तुमच्यासारख्या जेष्ठ नेत्यांचा सल्ला तरी घ्यायचा!
काँग्रेसला कोणकोणत्या राज्यात आघाडी मिळेल याचा अंदाज वर्तवण्यासाठी हा कॉम्प्युटर घेतला होता!
..आणि तशी आघाडी का मिळाली नाही. हे सांगण्यासाठी हा घेतला होता!


'आक्रस्ताळी व थयथयाट करणारे स्त्रीनेतृत्व' या अर्थाचा तीन अक्षरी शब्द सुचतोय का गं एखादा तुला ?
ममता !
पुढच्या महिन्यात मला देशभर प्रसिद्धी मिळेल? म्हणजे 'माझीही . भ्रष्टाचाराची प्रकरणं उघडकीस येतील'
असं सरळ सांगून का टाकत नाही तुम्ही?
हास्यविवेक
-विवेक मेहेत्रे
'आदर्श घोटाळ्यात सी.बी.आय.ने यांची चौकशी करू नये 'यासाठी मागच्या वेळचा होम होता... आता 'अटकपूर्व जामीन तरी मिळावा' यासाठी आहे हा होम !
'आजच्या पुढाऱ्यांची हुकमी अस्त्रं कोणती ?' असा प्रश्न विचारला कॉम्प्युटरला... उत्तर आलंय 'कोडगेपणा व निर्लज्जपणा'!
वास्तूविशेषांकासाठी साहेब मुलाखत देतील पण एका अटीवर... साहेबांच्या देशभरात एकूण किती ठिकाणी वास्तू आहेत हा प्रश्न विचारायचा नाही.


सध्या काही दिवस सूनबाईला पेपर वाचू देऊ नकोस...टी. व्ही. सुद्धा बातम्यांच्या वेळी बंद ठेव... नाहीतर ममताचं पाहून तीसुद्धा अवास्तव मागण्या करू लागेल...!!
'तुमचा मुलगा मोठेपणी पंतप्रधान होण्याची चिन्हं दिसताहेत ' असं का रे कळवलंय तुझ्या शिक्षिकेने?
... कारण मॅडमसमोर माझ्या वेदना क्वचितच बोलून दाखवतो मी !
हास्यविवेक
-विवेक मेहेत्रे
सत्कार
मी ह्यांची मुद्दाम ओळख करून देतोय.. कारण तुम्ही त्यांना अजिबात ओळखत नसाल... हे आहेत इथले नवे नगरसेवक ज्यांना तुम्ही नुकतंच निवडून दिलंय !!
मंत्रीसाहेबांनी तुमच्या अर्जावर URGENT असा शेरा मारलाय म्हणून आम्ही ७-८ महिन्यांत त्यावर ॲक्शन घेऊ ... नाहीतर २-३ वर्षं थांबावं लागलं असतं !
mehetre2011@gmail.com
मुलांच्या वार्षिक परीक्षेच्या टेन्शनमुळे आजारी पडलेल्या पालकांचा वॉर्ड आहे हा !!
APRIL WARD


हास्यविवेक
-विवेक मेहेत्रे
छे..छे..! गावी नाही चाललो...! बंड्याचं नाव व्हॅकेशन क्लासला घातलंय...!
पोहचवणार की पाडणार ?
कॅग अहवाल
तुरुंग
मी ह्या पेंटिंगला नाव देतोय... 'आदर्श घोटाळा'
सरकारी कार्यालयांना वरून आदेश आले आहेत की 'सुरक्षेचे नवे उपाय योजा'... म्हणून हा बोर्ड!!
अतिरेक्यांना प्रवेश नाही!
'बेमालूमपणे पैसे कसे खावेत?' या नावाचं पुस्तक मी लिहू शकेन असं का म्हणतेस?
कारण इतकी वर्षं मंत्री असूनही एकदाही भ्रष्टाचाराचा आरोप झाला नाही तुमच्यावर!


हास्यविवेक
-विवेक मेहेत्रे
थांबा जरा, मला हातमोजे घालू द्या, काळ्या पैशाला स्पर्शही करणार नाही असं वचन दिलंय अण्णा हजारेंना !
या वर्षभरात कोणत्याही मोठ्या घोटाळा प्रकरणात त्याचं नाव जर उघडकीस आलं नाही तर ते देवळाच्या ट्रस्टला दोन कोटी रुपयांची देणगी देणार आहेत.. देवा!
तरी तुम्हाला सांगत होते की तुमचं हृदय कमजोर आहे... हापूसची किंमत विचारू नका म्हणून!
हापूस आंबे
योग्य दरात मिळतील.
NO PARKING
वाहने उभी करू नयेत
पार्क नाही केलीय... खड्ड्यात अडकून पडलीय!
पगाराबरोबर 'विशेष कप भत्ता' हवाय?
हो! आय. पी. एल. सामन्यांच्या काळात दिवसातून अनेकदा चहाचे कप विसळल्या बद्दल !


हास्यविवेक
-विवेक मेहेत्रे
ह्या क्लासच्या उद्‌घाटनासाठी कनिमोझी व कलमाडी यांच्या तारखा मिळाल्या होत्या ....फक्त राजांच्या सुटकेची वाट पाहात होतो... आता दणक्यात तिघांच्या हस्ते उद्‌घाटन करीन
भ्रष्टाचार पचवण्याचे क्लासेस
(एका माजी सरकारी अधिकाऱ्याचा उपक्रम)
कोणती बॅग काढून देऊ? जिच्यातून १० कोटी मिळाले होते ती की जिच्यातून २० कोटी मिळाले होते ती?
'......' पासून देशाला वाचवायला हवं ' ... गाळलेल्या जागी अचूक शब्द भरण्याची स्पर्धा आहे..... आपल्या बंड्याने ३५० पर्याय लिहून कळवले आहेत!!
भव्य स्पर्धा
'रुपयाचं अवमूल्यन' या विषयावर प्रतिक्रिया हवी होती...पण तुम्हाला फक्त 'रुपयाच' कळतो म्हणता...? अवमूल्यन' काय असते हे ठाऊकच नाही... मग राहूंदे!!
'त्या' व्यंगचित्राचा निषेध असो!
मी ५-६ प्रमुख व्यंगचित्रकारांना फोन करून कळवून टाकलं की 'यात त्यांना दुखवण्याचा हेतू नाहीय, केवळ प्रसिद्धीसाठी हा स्टंट करतोय म्हणून'.... नाहीतर पुढेमागे आपल्यावरही व्यंगचित्रं रेखाटतील!!



हास्यविवेक
-विवेक मेहेत्रे
मागच्या महिन्यात कर्ज काढलं हे खरं.. पण ते माझ्या व्यवसायासाठी होतं .... आता हवंय ते ह्याच्या के. जी. प्रवेशाच्या डोनेशनसाठी!!
BANK OF
कर्ज
मॅनेजर
बाहेर या साहेब! सी.बी.आय.वाले आले म्हणून लपलात... पण ते सी.बी. आय. म्हणजे सेंट्रल बँक ऑफ इंडियामधले तुमचे मित्र आहेत!
मान्सूनचा अजून पत्ता नाहीय... अन् ह्यांना तर एका जाहिरात कंपनीसाठी पावसावरची कविता लिहून द्यायची आहे...म्हणून!
मॅरेज ब्युरो
'शिपायाच्या मुलीचं स्थळ ' सुचवलं म्हणून चिडता काय? मंत्र्यांचे शिपाई आहेत ते... दोन कोटी रुपये हुंडा देणार आहेत ते जावयाला!!
पुढच्या महिन्यात मला देशभर प्रसिद्धी मिळेल? म्हणजे 'माझं भ्रष्टाचाराचं मोठ्ठं प्रकरण उघडकीस येईल' असं सरळ सांगून का टाकत नाही तुम्ही?


हास्यविवेक
-विवेक मेहेत्रे
अण्णा हजारेंना आम्ही घाबरत नाही... आमच्या नेत्यांनी किती कमिशन घेतलं व परदेशी बँकांमध्ये त्यातलं किती ठेवलं हे निश्चित आकड्यांमध्ये ते सांगूच शकणार नाहीत!
'तुम्हाला कोणीही ओळखणार नाही अशा' गल्लीमध्ये जाऊन भाज्या विकत आणा.. इथे जवळपास भाजी खरेदी करताना कोणी मत्सरी माणसानं पाहिलं तर इन्कमटॅक्सवाल्यांना कळवेल!
छे..छे..रस्ता रोको वगैरे काही नाहीय!केवळ पावसाची पहिली तुरळक सर पडल्याचं निमित्त झालं...तेवढ्यामुळे रेल्वे व रस्त्यातील वाहतुकीवर हा असा परिणाम झाला बघा!
मी तुम्हाला म्हटलं नव्हतं की आमचा पक्ष दुष्काळाचा प्रश्न तातडीने सोडवेल म्हणून... ते पहा पावसाचे काळे ढग!!
पाठ्यपुस्तकात संदर्भ शोधताहेत? छे..छे..!! दरवर्षी जूनमध्ये पहिल्या आठवड्यात ते नव्या पाठ्यपुस्तकांतल्या चुका शोधून काढतात!



हास्यविवेक
-विवेक मेहेत्रे
हे पाहा, यापुढे अधिवेशनाच्यावेळी फेकण्यासाठी जादा चपला आणत चला... माझ्या चपला मी देणार नाही!
काय? तुमच्या भानगडींची सी.बी. आय चौकशी सुरू होऊन दोन महिने झाले... अन्-अजून तुम्ही त्या चौकशी अधिकाऱ्याची बदली घडवून आणली नाही?
'पाऊस किती पडला' हे मोजायला पर्जन्यमापक यंत्र कशाला हवं?... रस्त्यातल्या खड्ड्यात किती इंच खोल पाणी साठलंय ते फूटपट्टीने मोजायचं.. बस्स!!
वेधशाळा
'हवामानखात्याचे पावसाचे अंदाज यंदा का चुकले?' याची चौकशी करण्यासाठी त्रिसदस्य समिती सरकार जाहीर करतेय.. त्यात तुमची निवड नक्की होत आहे!!
ज्योतिष भास्कर
आजचे वर्तमानपत्र दोन भागांत आहे.. ही मोठी 'भ्रष्टाचार पुरवणी' अन् डाव्या हातात आहे नेहमीच्या बातम्या, जाहिराती वगैरे!
घोटाळे


हास्यविवेक
-विवेक मेहेत्रे
प्राथमिक शाळेच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त माझं भाषण लिहून दिलंत... पण त्यात 'अण्णा टीमला सज्जड इशारा देणारी' दोन-चार वाक्यं घालायला का विसरलात?
वाऽऽ काय योगायोग! पंधरा वर्षांपूर्वी दोन्ही जमातींचे ऐक्य होण्यासाठी उभारलेल्या या स्मारकाची कोनशिला आपणच बसवली होती अन् आज ते स्मारक दंगलीत जळून गेलेले पहाण्यासाठीही आपणच आलात!
साहेब... भाषण लवकर आटपा! कार्यकर्त्यांना सनी लियॉनचा नवा हॉट चित्रपट बघायला जायचंय!
स्वातंत्र्यदिन
१५ ऑगस्ट
स्वातंत्र्यदिनी रेव्ह पार्टीत माझा मुलगा सापडला ? तो असणंच शक्य नाही! तो सज्जन आहे... असल्या गोष्टी तो देशात करीत नाही... त्यासाठी तो बँकॉक-पटायाला जातो!!
TV


ममता बॅनर्जी जशा आडमुठेपणा करतात तशाच ह्या आमच्या सोसायटीतल्या बायका... 'कार्यक्रम व आरत्यांच्या वेळा वेगवेगळया टी.व्ही. सिरियल्सच्या वेळापत्रकांचा अभ्यास करून मगच ठरवा' या मागणीसाठी हट्ट धरून बसल्यायत !!
मंडपापुढे जाहीर उपोषण
हल्ली इंपोर्टेड वस्तूंची फार क्रेझ आहे... म्हणून!!
चायनीज मोदक, अमेरिकन जानवं, आरतीसाठी जपानी घंट्या
यंदाच्या डेकोरेशनचा विषय आहे.'घोटाळे' ... प्रेक्षकांनी पेटीत पैसे टाकले की आपोआप त्या कलशातून एकामागोमाग एक घोटाळे बाहेर पडू लागतील !!
मेरा देश महान!
- विवेक मेहेत्रे




साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com


हास्यविवेक
-विवेक मेहेत्रे
'माझा केजरीवाल किंवा अण्णा हजारेंशी कसलाही संबंध नाही' असं शपथपत्र घेऊन आलोय... आता तरी लाचेचे पैसे स्वीकारा... आणि माझं काम करा!
आम्ही आमच्या पक्षातील नेत्यांच्या घोटाळ्यांची चौकशी करणार... येत्या आठ आठवड्यांत... किंवा आठ महिन्यात वा आठ वर्षात...! पण चौकशी करणार एवढं निश्चित !!
जावई समर्थकांचा मेळावा
ते निष्पाप व निरपराध आहेत असं मी मिडीयासमोर ठासून सांगेन. नाहीतरी मॅडमना खुश करण्यासाठी मला निमित्त हवंच होतं!
जावयाच्या बेनामी व्यवहारांची माहिती येथे सांगावी. मंत्रीमहोदय स्वतः ती पूर्णपणे ऐकतील.
एका प्रसिद्ध पुढाऱ्याच्या व तुमच्या हातावरच्या रेषा अगदी सारख्या आहेत... त्यामुळे दोघांचाही व्यवसाय एकच... 'लोकांना टोप्या घालायचा'!!
तात्या टोपीवाले यांचे बेस्ट कॅप मार्ट


हास्यविवेक
-विवेक मेहेत्रे
या कागदावर तर मला काहीच दिसत नाही अन् तू म्हणतोस की यावर तू चित्र रेखाटलंयस, कसलं रे?
श्वेतपत्रिकेचे!
... म्हणजे तुमच्या घराची स्थिती अगदी मनमोहन सिंग सरकारसारखीच झालीय
म्हणा की!!
'भाषण कोणतंही असो, कोणापुढेही असो.. मॅडमचे जावई निष्पाप व निर्दोष आहेत हे ठासून सांगा'
असा आदेश आलाय वरून...
तेव्हा आधी ते बोला!!
आज कटकट न करता घरच्यानी तुला सिनेमाला कसं येऊ दिलं?
ENGLISH VINGLISH
श्रीदेवी दर्शनाला जातेय असं मी सांगितलं...त्यांना वाटलं की नवरात्रीलाच म्हणून!

आता खपले की ९२


हास्यविवेक
-विवेक मेहेत्रे
हॉटेल उडीपी
गॅस सिलिंडरच्या दर वाढीमुळे कोणत्या पदार्थाच्या किंमती कितीने वाढवाव्या लागतील व कोणत्या पदार्थाचे आकार कमी करावे लागतील याची यादी करताहेत आमचे मालक!
जाहिरात एजन्सी
केजरीवाल बद्दल एवढं काही छापून येतंय.. मग आणखी अख्खा स्वंतत्र त्या विषयावरील दिवाळी अंक कशाला काढताय?
केजरीवाल आमच्या साहेबांवरही आरोप करणार म्हणता? व्वा ...फारच छान! कोणताही खर्च न करता त्यांना देशभर प्रसिद्धी मिळेल हे काय कमी आहे !!
मी यंदा सव्वाशे दिवाळी अंकांसाठी कथा लिहितोय हे कोणाला सांगू नकोस हं... कालच मी 'मराठीला वाईट दिवस आले आहेत' असं ठणकावून सांगितलंय भाषणात.
AIRPORT
DEPARTURE
भ्रष्टाचाराचे आरोप झाल्यावर परदेशातील नेते नेमकं काय करतात हे जाणून घेण्यासाठी ते परदेशी निघालेयत !!


इकडे तिकडे
विवेक मेहेत्रे
अण्णा हजारे व अमिताभ 'ब्लॉग लिहितात' याचं काय कौतुक करता?अहो, आमचे तर ड्रायव्हर आणि मोलकरीण दर तासाला ट्विट करतात किंवा फेसबुकवर त्यांचे स्टेटस् अपडेट करतात!!
'देशातील वाढते घोटाळे कसे थांबवता येतील ?' याबाबतचे उपाय सुचवणारं पत्र वर्तमानपत्रांकडे पाठवण्यासाठी ते सकाळपासून लिहायला बसलेयत !!
सणासुदीला लावल्या जाणाऱ्या बॅनर्सवर माझा चेहरा फारच 'सात्विक' दिसतो.... तेथे 'राकट चेहरा' दिसायला हवा, तरच विभागात माझी दहशत राहील !!
फ्लेक्स बॅनर्स सम्राट
छे!छे!गावकऱ्यांची चांगल्या रस्त्यांची मागणी मुळीच पूर्ण करू नका ....एकदा चांगला पक्का रस्ता झाला की मग वेगवेगळ्या मागण्यांसाठी गावकरी रास्ता रोको आंदोलने 'सुरू करतील!!

# हास्य गंधाली

विवेक मेहेत्रे









# हास्य गंध

विवेक मेहेत्रे










दे धम्माल !!
विवेक मेहेत्रे
'त्या बेनामी प्रॉपर्टीशी आपला अजिबात संबंध नाही' असं सांगण्यासाठी आपण पत्रकार परिषद बोलावलीयत...पण बाहेर जमलेले पत्रकार 'आपली मालमत्ता किती कोटींची?' यावर पैजा लावताहेत!!
माझा परिचय करून देताना खबरदार 'आदर्श नेते' असं म्हणाल तर...लोकांना वाटेल की त्या 'आदर्श-कारगील घोटाळ्यात' माझासुद्धा सहभाग आहे की काय?'
मॅरेज ब्यूरो
गेल्या महिन्याभरात आलेल्या हिंदी चित्रपटातील नट्या जसे कपडे घालतात, तितके कमी व तोकडे कपडे घालायला आवडतात या मुलीला...त्यामुळे तिच्या कपड्यांवरती फारच कमी खर्च होईल तुमच्या मुलाचा!!
छे! छे! 'श्रेष्ठींनी त्यांचे पंख कापले' असं मिडियात छापून येतंय ते हे पंख नव्हेत....हा डेकोरेशनचाच एक भाग असून तो फार पूर्वीपासून इथे आहे!




'भारतीय बाजारपेठेत कोणत्या गोष्टीला डिमांड आहे' याची दखल चीनमध्ये प्रथम घेतली जाते. 'बलात्कार करणाऱ्यांचा निषेध असो' असं छापलेल्या टोप्यासुद्धा आता चीनमधून विकायला येतील!!


हास्यविवेक
-विवेक मेहेत्रे
विकास नेता
गुजरात
विनयभंग, बलात्कार या सारख्या क्षुल्लक गोष्टींसाठी पुरुषांना शिक्षा होऊ लागल्या तर देशातील तुरुंग भरून जातील...म्हणून 'हे' गुन्हेच नाहीत अशी भूमिका सरकारने घ्यावी व माझ्या अशिलाला सोडून द्यावे.....
प्रेस, मिडिया, टी.व्ही. सर्वत्र बलात्कारांचीच चर्चा सुरू आहे...
आपुन को क्या करने का!
राष्ट्रीय वृत्ती
(पहा..ऐका..आणि थंड बसा !! )
या नराधम हातांना कठोर शिक्षा होणार नसेल तर......
उद्या कायदे करणारांचेच हात कलम होणे अपरिहार्य ठरेल!
कायद्याचा वचक
नसलेले वासनांध



अब तेरा क्या होगा ?
तुमचे चांगलेच बारा वाजवले हो !!
२०१३
महा घोटाळे
नामवंतांचे मृत्यू
बलात्कार, हल्ले
अपघात
2012
भाववाढ
विवेक मेहेत्रे

# ई साहित्य प्रतिष्ठान

गेली पाच वर्षं ई साहित्याचा यज्ञ अव्याहत चालू आहे. तिनशे पुस्तकं. चाळीस देशांतले दिड लाख वाचक. पाच लाख हिट्स. चारशे लेखक कवींचा सहभाग. आणि हे सर्व शून्य पैशांत. ना देणगी. ना जाहिराती. ना विक्री. उत्तरोत्तर वाचकांचा प्रतिसाद वाढतोच आहे. उदाहरणच द्यायचे तर वेबसाईट्सना मिळणाऱ्या हिट्सचे. पाच लाख हिट्सपैकी तीन लाख हिट्स गेल्या आठ महिन्यातील आहेत. गुरू! ही तर आता आता सुरुवात आहे. पुढे खुपच मोठा पल्ला आहे.

आमचा संकल्प आहे की बारा कोटी मराठी माणसांपैकी निदान एक टक्का लोकांपर्यंत पोचायचेच. म्हणजे प्रत्येक पुस्तक बारा लाख लोकांपर्यंत पोहोचलेच पाहिजे. हळू हळू केरळप्रमाणे प्रत्येक मराठी साक्षर माणूस एक सजग वाचकही बनावा. माझ्या मायबोलीत ही शक्ती आहे. ज्ञानेश्वर माउलींची भाषा आहे ही, शिवबाच्या या मराठीत पुन्हा एकदा वाचनाची संस्कृती जन्म घेते आहे. एका वेगळ्या स्वरूपात. एका

नव्या अभियानात. एका नवीन विश्वाचे दरवाजे किलकिले झाले आहेत. आपण सर्वजण या जादूचे केवळ साक्षीदार नव्हे तर भागीदार बनूया. आपल्या ओळखीच्या लोकांचे फक्त बारा ई मेल आय डी आम्हाला पाठवा. आणि या भव्य यज्ञात भाग घ्या. आपण लेखक, कवी असाल तर आपले साहित्य पाठवा. आपल्या ओळखीच्या लेखक, कवींना या नव्या प्रयोगाबद्दल सांगा.

आणि काही वर्षांनंतर आपल्या नातवंडांना सांगा.... या जादूच्या भव्य प्रयोगात आम्हीही भागीदार होतो...

चला तर जादू करु या...

**आपल्या ओळखीच्या बारा लोकांचे मेल आय डी esahity@gmail.com ला कळवा.**

**खात्री बाळगा, या ई मेल्स चा वापर केवळ मराठी साहित्य पाठवण्यासाठी केला जाईल.**

धन्यवाद

टीम ई साहित्य प्रतिष्ठान